## पोलीस अधिक्षक औरंगाबाद ग्रामीण

| पोलीस अधिक्षक,कार्यालय | **प्रेस नोट** | दिनांक २९.०३.२०१७<br>०१.३० |
|---|---|---|

**प्रति,**

**मा.संपादक**

**दैनिक ..........**

**विषय :—औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दाखल /उघडकीस गुन्हयांबाबत.**

यावद्वारे आपणास सुचित करण्यात येते की, औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात दिनांक २८.०३.२०१७ रोजी खालील प्रमाणे गुन्हे दाखल /उघडकीस आले आहेत.

**०१) पोस्टे देवगावरंगारी:—** गुरन । ४३/१७ कलम ३७९ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी नामे संजय रामराव खोसरे वय ५० वर्ष व्यवसाय शेती रा. गल्लेबोरगाव ता. खुलताबाद यांनी फिर्याद दिली की यातील फिर्यादीचे सासरे उत्तम वामन झरेकर रा. केसापुर ता. कन्नड यांचे घरासमोर ठेवलेला १००००/—रू. किं. १२ ठीबक चे बंडल प्रत्येकी बंडल मध्ये ४०० मि. लांबीची ठीबक नळी रबरी काळयारंगाची कोणीतरी अज्ञात चोरटयाने लबाडीचे ईरादयाने चोरून नेला म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/३९२ खुळे पोस्टे देवगाव रंगारी हेकरीत आहे.

**०२) पोस्टे वैजापुर:—** गुरन । १३२/१७ कलम ४२० ३७९ ३४ भादवि नमुद गुन्हयाचे फिर्यादी महिला फिर्यादी यांनी फिर्याद दिली की यातील अनोळखी रिक्षा चालक व अनोळखी एक ईसम नाव गाव माहीत नाही यांनी यातील फिर्यादी ही रिक्षात बसुन प्रवास करीत असताना यातील वर नमुद आरोपीतांनी संगनमत करून फिर्यादीस रस्त्यावरचोर आल्याचे बतावणी करून फिर्यादीस तीचे अंगावरील दागिने पिशवीत टाकण्याचे सांगुन तीची फसवणुक करून पिशवीतील २६५००/—रू. कि. चा माल ज्यात सोन्याचे दागिने व १५००/—रू. रोखरक्कम चोरी करून घेवुन गेले म्हणुन गुन्हा दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/८७२ वेलगुडे पोस्टे वैजापुर हे करीत आहे.

आकस्मात मृत्युः—

**०१) पोस्टे खुलताबादः—** आ.मृ. नंबर १७/१७ कलम १७४ सिआरपीसी मधिल खबर देणार पुंजाराम हनुमंत गायकवाड वय ५० वर्ष व्यवसाय शेती रा. बाजारसावंगी ता. खुलताबाद यांनी खबर दिली की यातील मयत नामे नानासाहेब गायकवाड रा. बाजारसावंगी ता. खुलताबाद हा त्याचे मित्रासोबत सोबळगाव तलावात ता. खुलताबाद येथे पोहण्यासाठी गेला असता पाण्यात बुडुन मरण पावला वगैरे खबरी वरून आ.मृ. दाखल करण्यात आला असुन अधिक तपास पोह/९५१ जगताप पोस्टे खुलताबाद हे करीत आहे.

मुंबई दारूबंदी कायदाः—

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात पोस्टे पाचोड ला ०१ गुन्हा मुंबई दारूबंदी कायदया प्रमाणे ०२ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन १७५५/—रू. किं विदेशीदारू  असा एकुण माल जप्त करण्यात आला आहे.

मुंबई जुगार कायदाः—

औरंगाबाद ग्रामीण जिल्हयात पोस्टे पाचोड ला ०१ गुन्हा मुंबई जुगार कायदया प्रमाणे ०४ ईसमा विरूध्द दाखल झाले असुन त्यांचे कडुन ४०३१०/—रू. नगदी व मो.सा. व जुगाराचे साहीत्य असा एकुण माल जप्त करण्यात आला आहे.

स्वाक्षरीत
पोलीस अधिक्षक
औरंगाबाद ग्रामीण करीता

**श्री सफौ चव्हाण नियंत्रण कक्ष अधिकारी औरंगाबाद ग्रामीण**